# नाशिक महानगरपालिका,नाशिक
## जाहिरात व परवाने विभाग
राजीव गांधी भवन(मुख्यालय), शरणपुररोड नाशिक -४२२ ००२

---

**तात्पुरते ऊस रसवंतीगृह स्टॉल करीता मनपा खुल्या जागांची जाहिर लिलाव नोटीस**

---

नाशिक महानगरपालिकेच्या विभागनिहाय निश्चित केलेल्या खुल्या जागा(क्षेत्र १० X १५ चौ.फुट आकारमानाचे स्टॉलकरीता उपलब्ध जागेनुसार निश्चित केलेली जागा) दि.१०/०२/२०२६ ते दि.३१/०७/२०२६ अखेर पावेतो,तात्पुरते स्वरुपात ऊस रसवंतीगृहा करीता मनपा अटी-शर्ती नुसार,खालील परिशिष्टात नमुद खुल्या जागांचा जाहिर लिलाव प्रक्रीया,संबंधित विभागीय अधिकारी यांचे नियंत्रणात लिलाव प्रक्रीया बुधवार दि.०४/०२/२०२६ रोजी वेळ दु.३.०० वा. आयोजित करणेत आली आहे.तरी इच्छुकांनी लिलावाच्या दिवशी वेळेत उपस्थित राहुन लिलाव अटी- शर्तीची पुर्तता करुन लिलावात सहभाग घेता येईल.

| अ.क्र | खुल्या जागेचे ठिकाण | एकुण जागा संख्या | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | साईनाथ नगर चौफुली सिग्नलजवळ इंदिरानगर | १ | मनपाचे विभागीय कार्यालय नाशिक पुर्व दगडी इमारत मेनरोड,नाशिक येथील सभागृहात |
| २ | त्र्यंबकरोड हॉटेल राजदुत शेजारील गोल्फ क्लब मैदान कंपाऊडच्या आत(खुली जागा) | १ | मनपाचे विभागीय कार्यालय नाशिक पश्चिम नवीन पंडीत कॉलनी,नाशिक येथील सभागृहात (पहिला मजला) |
| ३ | गोरेराम मंदिर पायऱ्या लगत गंगाघाट येथिल खुली जागा | १ | |
| ४ | मुंबईनाका हॉटेल संदिप समोरिल खुल्या जागेत कंपाऊडच्या आत जुना आग्रारोड | १ | |
| ५ | त्र्यंबकरोड येथील नाशिक पंचायत समिती भिंतीलगतची जागा | १ | |
| ६ | अमृतधाम सॅनिटोरीयम भिंतीसमोर विडीकामगार वसाहतीकडे जाणा-या सर्व्हिस रोडलगत अग्निशमन दल कंम्पाऊड लागुन मोकया जागेत. | १ | मनपाचे विभागीय कार्यालय पंचवटी,मखमलाबाद नाका कै.पंडितराव खैरे इमारत मधील सभागृहात |
| ७ | शरदचंद्र पवार मार्केट यार्ड समोरील रस्त्याच्या बाजूस खुली जागा,पेठरोड | १ | |
| ८ | तपोवण साधुग्राम कार्यालय समोरील सिटीलिंक बसडेपो लगत खुली जागा | १ | |
| ९ | गणेशवाडी भाजी मार्केट मधील पाण्याच्या टाकी जवळील खुली जागा | १ | |
| १० | बी. आर. स्कुल स.नं. ३० कॅन्सर हॉस्पिटल समोर ३० मी. डी. पी. रोड रस्ता असून दक्षिणकडील बाजुस १८ मी. डी.पी. रस्ता शरचंद्र पवार मार्केट च्या दक्षिणकडील पांजरा पोळ लगत ची मोकळी जागा | १ | |
| ११ | रामलीला मंगल कार्यालयासमोरील पोलिस चौकी जवळील मोकळी जागा | १ | |
| १२ | बळीमंदिर जवळ प्रमोद महाजन गार्डनच्या समोरील भंगार दुकानापुढील मोकळी जागा | १ | |
| १३ | मखमलाबाद रोड रुंग्ठा श्री तिरुमला गुलमोहर बिल्डिंग समोरील श्री. मानकर यांच्या ऑफिस पुढील मोकळ्या जागेत | १ | |
| १४ | आडगांव एस.टी. स्टॅन्ड जवळ झाडाखालील मोकळी जागा | १ | |
| १५ | अरिहंत मार्बलच्या समोर, मुबंई छ. संभाजी नगर महामार्ग येथील मोकळी जागा | १ | |
| १६ | छ. संभाजीनगर तपोवन लिंक रोड येथील फुटपाथवरील उजव्या बाजुची मोकळी जागा | १ | |
| १७ | नाशिक महानगरपालिका सातपुर विभागीय कार्यालय समोर त्र्यंबकरोड. | १ | मनपाचे विभागीय कार्यालय सातपुर,त्रंबकरोड, येथील सभागृहात |
| १८ | अशोक नगर बस स्टॉपजवळ | १ | |
| १९ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था कंपाऊंड लगत सातपुर | १ | |
| २० | खंडेराव मंदिर भिंती लगत सातपुर गाव | १ | |
| २१ | मांगल्या पेट्रोल पंपासमोर अंबड लिंकरोड | १ | |
| २२ | मोतीवाला कॉलेज समोर लाईट डी पी लगत | १ | |
| २३ | बारदान फाटा गंगापुर रोड | १ | |
| २४ | महिंद्रा सर्कल अंबिका स्विट समोर एम आय डी सी भिंती लगत | १ | |

| अ.क्र | खुल्या जागेचे ठिकाण | एकुण जागा संख्या | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| २५ | कॅनॉल चौफुली लगत पाईपलाईनरोड आंनदवली | १ | |
| २६ | सातपुर गंगापुर लिंकरोड अशोकनगर टॉवर लाईन | १ | |
| २७ | जिल्हा परिषद मुख्यालय त्र्यंबक रोड १ नंबर गेट शेजारी | १ | |
| २८ | अबंड गांव मनपा शाळेजवळ उत्तर बाजुस शाळेच्या कंपाऊंड खुली जागा. | १ | मनपाचे विभागीय कार्यालय नविन नाशिक,अंबड पोलिस स्टेशन समोर नाशिक |
| २९ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ पाथर्डीफाटा | १ | |
| ३० | व्हीलोरिया जिमच्यासमोर गोविंदनगर जॉगिंग ट्रॅक लगत मोकळया जागेत | १ | |
| ३१ | आर.डी. सर्कल गोविंद नगर जॉगिंग टॅक लगत मोकळ्या जागेत | १ | |
| ३२ | वासन नगर ते गामणे ग्राऊंड रोडने गामणे मैदान लगत (फेरीवाला झोनच्या शेजारी) मोकळ्या जागेत | १ | |
| ३३ | आर्टिलरी सेंटर रोड गाडेकर मळा जॉगिंग ट्रक मुख्यप्रवेश व्दारा समोरील मनपा खुली जागा | १ | मनपाचे विभागीय कार्यालय नविन इमारत,दुर्गा गार्डन शेजारी,देवळाली, नाशिकरोड येथील सभागृहात |
| ३४ | मनपा नाटयगृह आरक्षित खुल्या जागेत जेलरोड | १ | |
| ३५ | बिटको चौक राजहॉटेल समोर उड्डाणपुलाखाली मनपा जागेत | १ | |
| ३६ | उडपी आनंदभवन समोर टेम्पो स्टॅन्ड लगत उड्डाणपुलाखाली मनपा जागेत | १ | |

---

## सविस्तर अटी - शर्ती

१. सदर लिलावात भाग घेणा-यास प्रत्येक स्टॉलच्या जागेसाठी अनामत र.रु.१५,०००/- लिलावापुर्वी संबंधित विभागीय कार्यालयात आगाऊ भरणे तसेच रहिवासी पुरावासह स्वत:चे ओळखपत्राची छायांकीत प्रत(२ प्रतीत)साक्षांकीत करुन सादर करावी लागेल(जसे आधारकार्ड/निवडणुक ओळखपत्र/वाहन परवाना/पॅनकार्ड,रहिवासी पुरावा म्हणुन लाईटबील/बैंक पासबुक)त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२. यशस्वी लिलाव धारकांस प्राप्त स्टॉलच्या जागेची अंतिम लिलाव बोलीप्रमाणे निश्चित केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील शासनाचा वस्तु व सेवाकराची १८ टक्के व इतर कर लिलाव प्रक्रीया संपुष्टात आल्यानंतर,त्याच दिवशी रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने(नावे नाशिक महानगरपालिका,नाशिक)भरणा करणे अनिवार्य आहे.त्याशिवाय जागेचा ताबा मिळणार नाही.

३. यशस्वी लिलाव धारकाने लिलाव अटी-शर्ती प्रमाणे लिलावाची रक्कम मुदतीत न भरल्यास,आगाऊ भरणा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येवुन सदरची जागा इतर मागणीधारकास वाटप करणेत येईल.

४. नाशिक महानगरपालिकेने उक्त परिशिष्ठात नमुद निश्चित केलेले ठिकाणे/जागा इ.मध्ये बदल करणे स्टॉलच्या जागेच्या संख्येत वाढ अथवा घट करणे.इ अधिकार राखुन ठेवल असुन त्यामध्ये काही कारणास्तव बदल झाल्यास सदर बदलानुसार तडतोड करणे यशस्वी लिलाव धारकावर बंधनकारक राहिल.

५. यशस्वी लिलावधारकाने मनपाच्या जागेवर शेडची उभारणी करणे, विद्युत वितरण कंपनीचा ना-हरकत दाखला प्राप्त करणे.बंधनकारक असुन त्यानंतरच व्यवसाय करता येईल.असे न केल्यास कायदेशिर कारवाईस पात्र राहील.

६. लिलाव सुरु होणेपुर्वी सविस्तर अटी-शर्तीचे वाचन करण्यात येवुन लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

७. लिलाव बोलीची किमान मर्यादा र. रु. ५००/- या प्रमाणे असुन, त्यापटीने बोली लागेल व किमान ३ बोली नंतर लिलाव कायम करण्यात येईल.

८. जाहिर लिलाव नोटीसमध्ये नमुद ठिकाणी १० X १५ चौ फुटाची खुली जागा अथवा त्या ठिकाणील उपलब्धतेनुसार जागा फक्त तातपुरते ऊस रसवंतीगृहासाठी दि.१०/०२/२०२६ ते दि.३१/०७/२०२६ या प्रमाणे कालावधी निश्चित आहे.तद्नंतर जागा मनपा ताब्यात देणे बंधनकारक आहे.मुदतीनंतर जागेचा वापर केलेला आढळल्यास दंडात्मक कारवाईस पात्र रहाल.

९. यशस्वी लिलावधारकाने मनपाच्या जागेवर स्वखर्चाने शेडची उभारणी करणे बंधनकारक आहे.

१०. यशस्वी लिलावधारकाने, विद्युत व्यवस्था स्वखर्चाने करणे व त्यानुसार विद्युत पुरवठयाचे देयक स्वत: अदा करावयाचे

११. लिलावातील प्राप्त जागेबाबत सरकारी खात्याकडुन अगर स्थानिक रहिवाशांकडुन तक्रारी प्राप्त झाल्यास, नियमाप्रमाणे परवानगी रद्द करण्यात येईल.

१२. एका व्यक्तिस/संस्थेस/गटास एकच जागा जाहिर लिलावात प्राप्त करता येईल.

१३. मा. न्यायालयाचे निर्देश, शासनाचे निर्देश/आदेश तसेच मा. जिल्हाधिकारी, नाशिक व मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर व नाशिक महानगरपालिका यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशाचे पालन करणे यशस्वी लिलावधारकावर बंधनकारक राहील.

१४. सर्व संबंधित व आवश्यक असणाऱ्या शासकीय कार्यालयाची परवानगी घेण्याची जबाबदारी यशस्वी लिलावधारकावर राहिल.

१५. महाराष्ट्र शासनाने प्लास्टिक व थर्माकॉल वर बंदी असुन सदर नियमाचे पालन करणे अनिवार्य आहे.

१६. यशस्वी लिलावधारकाने जागे बाबत भरणा केलेली सुरक्षा अनामत मुदत संपल्यानंतर,जागा पुर्ववत स्वच्छ व जैसेथे करुन देणे बंधनकारक आहे.तद्नंतर अनामत रक्कम प्राप्त करणेकरीता मागणी अर्ज व त्या सोबत अनामत रक्कमेची मुळ पावती तसेच मनपाचे इतर थकबाकी नसले बाबतचा दाखला सादर केल्यानंतर,अनामत रक्कम अदायगी करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

१७. यशस्वी लिलावधारकाने प्राप्त केलेल्या जागेवर कुठल्याही प्रकारचे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.

१८. यशस्वी लिलावधारका कडुन जागेचे काही नुकसान केल्याचे आढळुन आल्यास, सदर जागेच्या दुरुस्तीकामी येणारा खर्च मनपा निश्चित करेल, व त्यानुसार सदरचा खर्चाची भरपाई, मुदतीत भरणा करणे अनिवार्य राहील.

१९. नैसर्गिक अथवा अनैसर्गिक कारणास्तव वित्त तसेच जिवीत हानी झाल्यास, त्याबाबतची कोणतीही जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

२०. यशस्वी लिलावधारकाने, ऊस रसवंती व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करता येणार नाही.

२१. फुड लायसन्स संबंधित शासकीय विभागाकडुन नियमाप्रमाणे रितसर घ्यावे लागेल.

२२. यशस्वी लिलावधारकाने, कायदा व सुव्यवस्था यांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

२३. सदर जागेची कोणत्याही कारणास्तव महानगरपालिकेस आवश्यकता लागल्यास किंवा कोणत्याही अटी-शर्तीचा भंग झाल्यास सदरची जागा विनाहरकत महानगरपालिका २४ तासाच्या सुचनेने ताब्यात घेईल.व त्यासाठी कोणतीही भरपाई देय राहणार नाही.

२४. यशस्वी लिलावधारकाने, मनपा मालकिच्या जागेचे कोणत्याही त-हेने हस्तांतर, पोटभाडेकरु, बक्षिस, गहाण, असाईनमेंट वगैरे करता येणार नाही. अगर गुडविलने जागा परस्पर दुस-यास बहाल करता येणार नाही. तसेच जागा संपूर्णपणे अगर अशंत: दुस-याच्या नावावर करुन देता येणार नाही. तसेच जागेत भागिदार घेता येणार नाही.

२५. यशस्वी लिलावधारकाने, जागेचा सर्व परिसर स्वच्छ ठेवणे व कचरा/निर्माल्य साफसफाई करुन तो एकत्र जमा केलेला कचरा/निर्माल्य घंटागाडीत टाकणे अनिवार्य आहे.

२६. यशस्वी लिलावधारकाने, प्राप्त केलेल्या जागेत व्यवसाय न केल्यास, भरणा केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील वस्तु व सेवा कर इ. लिलावधारकास परत अदा केली जाणार नाही.तसेच उक्त नमुद अटी शर्तीचा भंग झाल्यास भरणा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२७. आगामी सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होणार असल्याने,नाशिक महानगरपालिकेस सदर जागेची आवश्यकता भासल्यास कोणतीही हरकत न घेता सदर जागा तात्काळ रिक्त करून देणे हे यशस्वी लिलावधारकावर बंधनकारक राहील. याबाबत कोणताही दावा, हरकत किंवा नुकसानभरपाईची मागणी करता येणार नाही.

सदर लिलाव मान्यकरणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे / जागांचा लिलाव तहकूब/बदल करणे, नविन अटी-शर्तीचा समावेश करणे इ. अधिकार मा.आयुक्त नाशिक महानगरपालिका,नाशिक यांनी राखुन ठेवलेले आहेत. नाशिक मनपाने निश्चित केलेल्या उक्त नमुद अटी-शर्तीचे पालन करणे लिलावात भाग घेणारे / यशस्वी लिलावधारकांवर बंधनकारक आहे.

(अजित निकत)
उपआयुक्त(जापवि)
नाशिक महानगरपालिका,नाशिक